# अमरावती महानगरपालिका अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/आयु/पर्यावि/०४ /२०२४.
दिनांक :- 03/04/24

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती.

२. उपअभियंता १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती.

३. वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता), महानगरपालिका अमरावती.

४. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका अमरावती.

५. सिस्टीम मॅनेजर, महानगरपालिका अमरावती.

६. जनसंपर्क अधिकारी , महानगरपालिका अमरावती.

७. सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी , झोन क्र. १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती.

८. जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, झोन क्र. १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती.

**विषय :-** प्लास्टिकपासुन / कृत्रिमरित्या बनविलेल्या नायलॉन मांजामुळे पक्षी व मानवास होणाऱ्या इजांबाबत पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलम ५ अन्वये दिलेल्या निर्देशाचे पालन होण्याबाबत.

संदर्भ :- १ . मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर, जनहित याचीका क्र. १/२०२१ मधील आदेश दि. १५/१२/२०२१

२. कार्यालयीन आदेश जा. क्र. अमनपा/पर्यावि/१६०/२१, दि. २९/१२/२०२१

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर, सुमो टू जनहित याचीका क्र.१/२०२१ मधील आदेश दि. ०६/०१/२०२३

४. कार्यालयीन सुधारीत आदेश जा. क्र. अमनपा/आयु/ पर्यावि/१६९/२३, दि. १२/०१/२०२३

५. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –अ क्रमांक ५९ , पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक – ०१ मार्च २०२३.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ अन्वये शहरामध्ये पंतगोत्सव / पतंग उडविणेकरीता नायलॉन /प्लास्टिक/कृत्रिम साहित्य वापरुन तयार होणाऱ्या मांजाचा वापर / विक्री प्रतिबंधीत करण्याबाबत निर्देश प्राप्त होते. त्या अनुषंगाने शहरामधील विक्रेत्यांकडून नायलॉन मांजाची विक्री / वापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्यास नायलॉन जप्ती दंडात्मक स्वरुपाची कार्यवाही करण्याबाबत विस्तृत आदेश संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित करण्यात आले होते.

विषयांकित प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपुर, येथे सुमो टु जनहित याचीका क्र. ०१/२०२१ दाखल असुन यामध्ये दि. ०६/०१/२०२३ रोजीचे आदेश निर्गमित झाले आहेत. सदरहु आदेशान्वये नायलॉन मांजाचे विक्री, वापर यावर प्रतिबंध घालण्याकरीता या संदर्भातील कारवाई अधिक व्यापक करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत. त्याअन्वये पोलीस, महसुल, स्थानिक स्वराज्य संस्थेचे उच्च अधिकारी यांचा समावेश असलेला टॉस्क फोर्स मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गठीत करण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भ क्र. ३ अन्वये निर्गमित आदेशानुसार नायलॉन मांजा बाळगणाऱ्या व्यक्तिंविरुध्द ०६ महिन्यापर्यंत शिक्षेसह कमीत कमी १०,०००/- रु. दंडाची तरतुद आहे. तसेच नायलॉन मांजाची निर्मिती, विक्री, वाहतुक करणाऱ्याविरुध्द ०३ ते ०५ वर्षापर्यंत शिक्षेसह किमान १,००,०००/- रुपये दंडाची तरतुद आहे.

पतंग उडविण्याकरीता नायलॉन मांजाचा वापर करू नये तसेच शहरातील कोणत्याही विक्रेत्याने नायलॉन मांजाची विक्री करु नये याकरीता उपाययोजना म्हणून, नायलॅान मांजा जप्तीची कार्यवाही करणे, नायलॉन मांजा जप्त करुन अशा आस्थापनांना वरनमुद प्रमाणे दंडात्मक स्वरुपाची कारवाई करण्याकरीता सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी यांचे नियंत्रणात झोननिहाय जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरिक्षक यांचे पथक संदर्भ क्र. २ अन्वये यापुर्वीच गठीत करण्यात आले आहे. तथापि मा. उच्च न्यायालयाचे संदर्भ क्र. ३ अन्वये निर्गमित आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये नॉयलॉन मांजा प्रतिबंधीत करण्यासंदर्भातील कारवाई करणेकरीता यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन संदर्भ क्र. ४ अन्वये सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. (सुलभ संदर्भाकरीता प्रत संलग्न)

संदर्भ क्र. ५ अन्वये निर्गमित राजपत्रानुसार येणेप्रमाणे निर्देश प्राप्त आहेत.

(१) चिनी मांजा किंवा चिनी दोर म्हणून सर्वसाधारणपणे ज्ञात असलेल्या धाग्यांसहित नायलॉन, (सिंथेटीक) कृत्रिम किंवा बारीक चुरा केलेली काच, धातू किंवा अन्य कोणताही तीक्ष्ण पदार्थ यांनी अवगुंठित केलेला असा कोणताही धागा, यांची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर यावर निर्बंध असतील.

(२) पतंग उडविण्यासाठी कोणताही तीक्ष्ण धातू, किंवा काचघटक किंवा चिकटपदार्थ किंवा धागा मजबूत करणारा पदार्थ नसलेल्याच केवळ सुती धाग्यास परवानगी असेल ; आणि

(३) यासोबत जोडलेल्या अनुसूचित नमुद केलेले सर्व अधिकारी त्यांच्या सबंधीत अधिकार क्षेत्रात वरील निदेशांची अंमलबजावणी करतील.

विषयांकित प्रकरणी नायलॉन मांजा, चिनी मांजा किंवा चिनी दोर, नायलॉन , (सिंथेटीक) कृत्रिम किंवा बारीक चुरा केलेली काच, धातू किंवा अन्य कोणताही तीक्ष्ण पदार्थ यांनी अवगुंठित केलेला असा कोणताही धागा, यांची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर होत असल्याचे निर्दशनास आल्यास सर्व संबंधीत अधिकारी यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये निर्गमित आदेशानुसार कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल सादर करावा. तसेच उपरोक्त आदेशाच्या अंमलबजावणी मध्ये कुठलीही हयगय झाल्यास संबंधीत अधिकारी त्याकरीता वैयक्तीक जबाबदार राहतील याबाबतची नोंद घ्यावी.

(देविदास पवार)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

**प्रतिलीपी -**

१. उपायुक्त ( प्रशा. / सा./कर), महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.

२. विधि अधिकारी, महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.

३. सुरक्षाधारीका.

(देविदास पवार)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

´E/ ssd/ Nylon Manja /47